आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२२ मे २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टो डुली डेस यांच्यात द्विपक्षीय चर्चा, विविध क्षेत्रातलं सहकार्य मजबूत करण्यावर भर

- राज्यसभेच्या २४ जागांच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी १८ जूनला मतदान

- राज्यात पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची मंत्री छगन भुजबळ यांची माहिती, आवश्यक तितकंच इंधन खरेदी करण्याचं आवाहन

**आणि**

- चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात चार महिलांचा मृत्यू

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टो डुली डेस यांच्यात नवी दिल्लीत हैदराबाद हाऊस इथं आज द्विपक्षीय बैठक  झाली. या चर्चेत व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, शिक्षण, संस्कृती, स्थलांतर, संरक्षण आणि सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता, फिनटेक, नवोन्मेष आणि संशोधन अशा विविध क्षेत्रांतील सहकार्य अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. तसंच प्रादेशिक आणि जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवरही दोन्ही नेत्यांनी सविस्तर चर्चा झाली.

भारत आणि सायप्रस देशांमध्ये असलेले मैत्रीपूर्ण संबंध हे मजबूत असून भविष्यात ते अधिक दृढ होतील, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या भेटीनंतर प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात व्यक्त केला आहे. गेल्या दशकात सायप्रसमधून भारतात होणारी गुंतवणूक जवळपास दुप्पट झाल्याचंही त्यांनी सांगितलं. भारत-युरोपियन संघात झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे नव्या संधी निर्माण झाल्या असून, उभय देशांमधील विश्वास अधिक दृढ झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

- **- होल्ड बाईट मोदी- - -**

गेल्या वर्षभरात भारत-सायप्रस आणि भारत-युरोपियन संघ संबंध अधिक दृढ झाले आहेत असं सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टो डुली डेस यांनी सांगितलं. प्रधानमंत्री मोदी

यांच्या सायप्रस भेटीनंतर द्विपक्षीय भागीदारीला अधिक चालना मिळाल्याचंही त्यांनी सांगितलं.

द्विपक्षीय चर्चेपूर्वी निकोस क्रिस्टो डुली यांनी राजघाट इथं जाऊन महात्मा गांधींच्या स्मृतीस्थळावर जाऊन अभिवादन केलं. आज संध्याकाळी निकोस हे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवनात जाऊन भेट घेणार आहेत. निकोस यांच्या सन्मानार्थ राष्ट्रपती भवनात स्नेहभोजनाचं आयोजन करण्यात आलं आहे. दरम्यान, नवी दिल्लीत येण्यापूर्वी निकोस यांनी मुंबईला भेट दिली आणि तिथे आयोजित कार्यक्रमात सहभागी झाले.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नवतंत्रज्ञानाच्या सहाय्यानं महाराष्ट्र सर्वच क्षेत्रांमध्ये देशात आपला ठसा उमटवत आहे,  नवीन उद्योग, तंत्रज्ञान आणि डाटा सेंटर आधारित व्यवसाय उद्योग स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र ही एक मजबूत परिसंस्था बनत आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईतल्या जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये  इमॅजिनेक्स २०२६ या कार्यक्रमात मुलाखतीत ते बोलत होते.  २०१५ मध्ये महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुमारे १४ लाख कोटी रुपये  होती, जी आज ५४ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. त्यामुळे २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट नक्कीच साध्य करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

दहा राज्यांमधल्या राज्यसभेच्या २४ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक निवडणूक आयोगाने आज जाहीर केलं. ही निवडणूक १८ जूनला होणार असून त्याचदिवशी मतमोजणी होणार आहे. १ जून रोजी निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी केली जाईल, असं निवडणूक आयोगाने सांगितलं. माजी प्रधानमंत्री एच. डी. देवेगौडा, केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन आणि रवनीत सिंग हे राज्यसभा सदस्य पुढल्या महिन्यात निवृत्त होत आहेत. तसंच आंध्रप्रदेश, गुजरात आणि कर्नाटकातल्या प्रत्येकी चार, राजस्थान आणि मध्यप्रदेशातल्या प्रत्येकी तीन, झारखंडमधल्या दोन आणि मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराममधली प्रत्येकी एक जागा रिक्त होणार आहे.

याशिवाय राज्यसभेच्या दोन जागांसाठीची पोटनिवडणूकही निवडणूक आयोगाने आज जाहीर केली. महाराष्ट्राच्या उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि अण्णा द्रमुकचे नेते सी. व्ही.

षण्मुगम हे विधानसभेवर निवडून गेल्यामुळे या दोन जागा रिक्त झाल्या आहेत. पोटनिवडणुकीसाठीही १८ जूनलाच मतदान होणार आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, इंधन टंचाई निर्माण होण्याच्या अफवा पसरवल्या जात असून, राज्यात पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती, राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. नागरिकांनी भीतीपोटी अतिरिक्त पेट्रोल-डिझेल खरेदी करून साठवणूक करू नये, गेल्या काही दिवसांत अनेक ठिकाणी गरजेपेक्षा अधिक इंधन खरेदी केल्याने मे महिन्यात नेहमीच्या तुलनेत पेट्रोल-डिझेलची सुमारे २० टक्के अधिक विक्री झाल्याचं त्यांनी सांगितलं. नागरिकांनी संयम बाळगून आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावी आणि प्रशासनाला सहकार्य करावं, असं आवाहन देखील भुजबळ यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

देशभरात गेल्या दहा वर्षांमध्ये अनेक परीक्षांचे पेपर फुटले त्यातही नीट सारख्या परीक्षांचे पेपर फुटत असतील तर त्याला केंद्र सरकारच जबाबदार असून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी घेऊन राजीनामा द्यायला हवा, अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वड्डेटीवार यांनी नागपूर इथं केली. संवेदनशील पदावर बसलेल्या मंत्र्यांना विद्यार्थ्यांच्या भविष्याची काळजी दिसत नाही, डिझेल -पेट्रोलचा तुटवडा, खतांचा अपुरा साठा अशा अनेक समस्यांचा देश सामना करत आहे, मात्र सरकारचं लक्ष तरूणांचे ट्विटर हँडल बंद करण्याकडे असल्याची टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

वाढत्या महागाईच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारचा निषेध करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज नागपुर शहरात जोरदार आंदोलन केलं. नागपूर शहरातल्या व्हरायटी चौकात ‘मेलोडी’ चॉकलेटचं वाटप तसंच जोरदार घोषणाबाजी करत आंदोलनकर्त्यांनी यावेळी सरकारची खिल्ली उडवली. पेट्रोल, डिझेल तसंच गॅस सिलिंडरसह दैनंदिन गरजेच्या वस्तू महागल्यामुळं सर्वसामान्य नागरिक हैराण झाल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचा राहुल गांधी यांच्याबद्दलचा रिजेक्टड माल हा शेरा म्हणजे संसदीय लोकशाही बद्दलचं अज्ञान असल्याची टीका कॉँग्रेस चे प्रवक्ते सचिन सावंत यांनी केली आहे. अशा प्रकारचा आरोप करून फडनवीस यांनी त्यांची बौद्धिक दिवाळखोरी उघड केली असल्याचं सावंत यांनी एका निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात चंद्रपूर इथं तेंदूपत्ता गोळा करणाऱ्या चार महिलांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती वन अधिकाऱ्याने दिली आहे. सिंदेवाही तालुक्यातल्या गुंजेवाही गावातल्या या महिला आज पहाटे तेंदूपत्ता गोळा करण्यासाठी गेल्या होत्या, त्यावेळी वाघाने त्यांच्यावर हल्ला केला, यात त्यांचा मृत्यू झाला. मात्र या महिलांचा मृत्यू एकाच वेळी आणि एकाच ठिकाणी झाला की वेगवेगळ्या वेळी आणि ठिकाणी झाला हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाचं पथक घटनास्थळी पोचल्याचं चंद्रपूर परिमंडळाचे मुख्य वनसंरक्षक आर. एम. रामानुजन यांनी सांगितलं. पंचानामा केल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. हल्लेखोर वाघाचा माग काढण्यासाठी वन विभागानं विशेष पथक नियुक्त केलं असून परिसरात गस्त वाढवली आहे. नागरिकांनी पुढील काही दिवस जंगल परिसरात एकट्याने न जाण्याचं आवाहन वन विभागानं केलं असून, कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ वन विभागाशी संपर्क साधावा, असं सांगितलं आहे.

**<><><><><>**

मुंबई ॲक्वा मेट्रो लाईन ३ आज सकाळी तांत्रिक बिघाडामुळे सुमारे अर्ध्या तासासाठी बंद पडली होती. यासंदर्भात मेट्रो प्रशासनानं कोणतीही घोषणा न केल्यानं या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. मेट्रो सेवा बंद पडल्याबाबत कोणतीही उद्घोषणा केली जात नसल्याने अनेक स्थानकांवर प्रवाशांची गर्दी उसळली होती. हा बिघाड दुरुस्त केला असून आता ही सेवा सुरळीत सुरू झाल्याचं या पत्रकात म्हटलं आहे. मात्र, हा बिघाड नेमका कशामुळे झाला याचा उल्लेख केलेला नाही.

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठाच्या बीएमएस अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या वर्षाचा अर्थात ६व्या सत्राचा निकाल काल जाहीर झाला. या निकालाची टक्केवारी ८३ पूर्णांक ४७ शतांश इतकी असल्याचं मुंबई विद्यापीठानं कळवलं आहे.

**<><><><><>**

विदर्भासह उत्तर प्रदेश  आणि मध्यप्रदेशात आज उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट भारतीय हवामान विभागानं दिला आहे.

दिल्ली, हरियाणा आणि चंदीगडला ऑरेंज अर्लट दिला आहे. पंजाब, बिहार, छत्तीसगड, झारखंड, ओदिशा, राजस्थान, तामिळनाडू, पुद्दुचेरी, काराईकल आणि तेलंगणा या राज्यांतही पुढील दोन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. तर पश्चिम बंगाल, ओदिशा इथं आज आणि उद्या तापमानात वाढ  आणि  हवेतील आर्द्रता वाढण्याचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**